


| वर्ष - 8 | अंक - 209 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

www.mahaenews.com | गुरूवार, दि. 13 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- पुण्यात उत्सवांमध्ये ध्वनीवर्धक मर्यादा शिथिल!
- पिंपरी-चिंचवडमध्ये तब्बल 2 हजार 845 अतिक्रमणे हटविली!
- एका झटक्यात गोल... क्रीडा पेज

## लोक काम करण्यापासून परावृत्त होत आहेत...

# 'लाडकी बहीण'वर सर्वोच्च न्यायालयाची नाराजी!

## निवडणूक जिंकण्यासाठी राजकीय पक्षांकडून मोठी आश्वासने देशाच्या हिताची नाहीत

। पुणे । महाईन्यूज

**गेल्या काही वर्षांमध्ये राजकीय पक्ष निवडणुकांच्या तोंडावर नागरिकांसाठी विविध योजना जाहीर करत आहेत. ज्यामुळे मोफत लाभांच्या योजनांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. अशात बुधवारी या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि म्हटले की, अशा योजनांमुळे लोक काम करण्यापासून आणि देशाच्या विकासात सहभागी होण्यापासून परावृत्त होत आहेत. न्यायमूर्ती बीआर गवई म्हणाले, "दुर्दैवाने, या मोफत योजनांमुळे लोक काम करण्यास तयार नाहीत. त्यांना मोफत रेशन मिळत आहे. त्यांना कोणतेही काम न करता पैसे मिळत आहेत."**

मध्य प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्र (लाडकी बहीण योजना) यासारख्या राज्यांमध्येही मासिक आर्थिक मदतीची अशीच आश्वासने देण्यात आली होती, ज्यामुळे त्या-त्या राज्यांच्या निवडणुकीत भाजपाच्या विजयात या योजनांनी मोठा वाटा उचलला होता.



### मोफत रेशनमुळे...

दरम्यान न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर एका याचिकेवर सुनावणी सुरू होती. त्यावेळी न्यायमूर्ती बीआर गवई यांनी ही टिप्पणी केली. या याचिकेत शहरी भागातील बेघर लोकांना आश्रय देण्याची मागणी करण्यात आली होती.

यावेळी सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, "मोफत रेशनमुळे, निवडणुका जाहीर झाल्यावर लोक काम करण्यास तयार नसतात. त्यांना कोणतेही काम न करता मोफत रेशन मिळत आहे. माफ करा, पण या लोकांना मुख्य प्रवाहातील समाजाचा भाग न बनवून आपण परजीवींचा एक वर्ग निर्माण करत आहोत असे वाटत नाही का?

### दिल्ली विधानसभेत पक्षांची आश्वासने

दिल्ली विधानसभा निवडणुकीनंतर काही दिवसांनी सर्वोच्च न्यायालयाने ही कठोर टिप्पणी केली आहे. दरम्यान दिल्ली विधानसभा निवडणुकीदरम्यान भाजपा आणि आप या दोन्ही पक्षांनी ते सत्तेत आल्यानंतर मोफत लाभाच्या विविध योजनांची घोषणा केली होती. 'आप'ने दिलेल्या आश्वासनांमध्ये महिला सन्मान योजना (प्रत्येक महिलेला मासिक २,१०० रुपये मदत), पाण्याचे बिल माफ करणे, विद्यार्थ्यांसाठी मोफत बस प्रवास आणि विद्यार्थ्यांसाठी मेट्रो भाड्यात ५०% सूट यांचा समावेश होता. दुसरीकडे भाजपाने महिलांना दरमहा २५०० रुपये मदत, दर होळी आणि दिवाळीला मोफत सिलिंडर देण्याचे आश्वासन दिले होते. दरम्यान ८ फेब्रुवारी रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. यामध्ये भारतीय जनता पार्टीने तब्बल २७ वर्षांनी पुन्हा एकदा दिल्ली विधानसभा निवडणुकीत सत्ता मिळवली आहे.

---

## वायुवेग पथकांकडून वाहनचालकांना दणका

## अतिवेगाची हौस : 14 हजारांपेक्षा जास्त बेशिस्तांवर कारवाई

। पुणे । महाईन्यूज। प्रतिनिधी

**महामार्गावर वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. परंतु काही बेशिस्त वाहनचालक अतिवेगाने वाहन चालवितात. अशा वाहनचालकांना आरटीओच्या वायुवेग पथकाने दणका दिला असून, राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावरील १४ हजारांपेक्षा बेशिस्त वाहनचालकांवर आरटीओच्या वायुवेग पथकाने कारवाई केली आहे.**



1. राज्य महामार्गावरील कारवाई - ६,४३७
2. राष्ट्रीय महामार्गावरील कारवाई - ७, ५९१
3. एकूण कारवाई- १४, ०५८

महामार्गावर वाहन चालविताना अपघात होऊ नये, यासाठी प्रत्येक गाडी ठरविलेल्या वेगाने आणि नियमानुसार चालविणे आवश्यक आहे. तसेच वळण मार्ग, घाट मार्गात गाडीचा वेग कमी ठेवणे गरजेचे असते. परंतु अशा ठिकाणी काही वाहनचालकांकडून ओव्हर स्पीडने (अतिवेग) गाडी चालविण्यात येते. अशा वाहनचालकांवर आरटीओच्या वायुवेग पथकाकडून कारवाई करण्यात येते.

याशिवाय ओव्हरलोड (अवजड), लेन कटिंग, ड्रंक अँड ड्राइव्ह, मोबाइल टॉकिंग, सीटबेल्ट, फॅन्सी नंबरप्लेट, अनधिकृत पार्किंग, नो-एन्ट्री, थकीत कर, योग्यता प्रमाणपत्र नाही (फिटनेस तपासणी) यांसह विविध कारणांमुळे पुणे आरटीओकडील वायुवेग पथकाकडून (मोटार वाहन निरीक्षक) कारवाई करण्यात येते. सन २०२३ पेक्षा गेल्या यामध्ये वाढ झाली असून, वाहनचालकांनी नियम पाळून वाहन चालवावी, असे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे.

### वेगमर्यादा आवश्यक


महामार्गावरील वाढते अपघात कमी करण्यासाठी मोटार वाहन कायद्यांतर्गत वायुवेग पथकांमार्फत कारवाई केली जाते. राज्य तसेच राष्ट्रीय महामार्गावर गेल्या वर्षी १४ हजारांपेक्षा अधिक बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहन चालविताना वेगावर मर्यादा ठेवणे आवश्यक आहे, अशी माहिती पुण्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी दिली.

# पुण्यात उत्सवांमध्ये ध्वनीवर्धक मर्यादा शिथिल!

## उत्सव मंडळांना गुड न्यूज: गणेशोत्सवासाठी 6 दिवस, नवरात्रात मिळणार 2 दिवस

। पुणे । महाईन्यूज। प्रतिनिधी।

**जिल्ह्यासाठी वर्षभरातील उत्सवांसाठी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाच्या वापरासाठी जिल्हा प्रशासनाने १५ दिवस निश्चित केले आहेत. त्यात गणेशोत्सवासाठी ६ दिवस तर नवरात्रासाठी २ दिवस ध्वनीमर्यादा सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत शिथिल करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.**



केंद्र सरकारच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियमानुसार जिल्ह्यात १५ दिवसांसाठी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाच्या वापरासाठी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत वापर करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

त्यात शिवजयंती बुधवार१९फेब्रुवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोमवार १४ एप्रिल, महाराष्ट्र दिन गुरवार १ मे, गणपती उत्सव, ईद ए मिलाद व अनंत चतुर्दशीपर्यंत सोमवार १ ते शनिवार ६ सप्टेंबरपर्यंत ६ दिवस, नवरात्री उत्सव १ व २ऑॅक्टोबरपर्यंत २ दिवस, नाताळ गुरुवार २५ डिसेंबर व वर्षाअखेर बुधवार ३१ डिसेंबर असे १३ दिवस असतील. तसेच महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार २ दिवस परवानगी दिली जाईल असेही डूडी यांनी काढलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

उत्सवाच्या दिवशी या वेळेत ध्वनीची विहित मर्यादा राखून ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर करावा. झोनींग प्रमाणे ठरलेल्या मयादेपेक्षा जास्त आवाज ठेवू नये. ही सूट शांतता क्षेत्रात लागु नसल्याने त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित सर्व यंत्रणांची राहील असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### ध्वनी प्रदूषण कमी करणे शक्य...

महाराष्ट्रात जन्म असो वा लग्न, धार्मिक कार्यक्रम असो वा सामाजिक समारंभ, सण असो वा उत्सव, प्रत्येक ठिकाणी ध्वनिक्षेपक दिसतात. बऱ्याच वेळा ध्वनिक्षेपकाचा आवाज मर्यादेपेक्षा कितीतरी अधिक चढलेला असतो. महाराष्ट्रात गणेशोत्सवात ध्वनिक्षेपकांच्या आवाजाचा स्तर सर्वाधिक असतो. धार्मिक कार्यक्रमांबाबत लोकांच्या भावनांचा आदर करून यंत्रणेतील अधिकारी कारवाई टाळतात. कारवाई केल्यास असंतोष पसरण्याची भीती असते. परंतु वाहनांमधील कर्कश म्युझिक सिस्टीम आणि अन्य कार्यक्रमांवेळी लावल्या जाणाऱ्या ध्वनिक्षेपकांवर कारवाई करून तेवढे तरी प्रदूषण कमी करता येणे शक्य आहे.

---

# पुण्याचे दळणवळण गतिमान करण्यासाठी आता

## रस्ते विकासावर भर: येरवडा ते कात्रज भुयारी मार्ग तयार होणार!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची बारावी सभा मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात आज झाली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यामध्ये एकूण १२ विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यात २०२५-२६ च्या अर्थसंकल्पास मंजुरी दिली आहे. ४५९३ कोटी जमा आणि ४२९५ कोटी खर्च असा २९८ कोटी शिलकीच्या अर्थसंकल्पास मंजुरी देण्यात आली. पर्यटन, तीर्थक्षेत्र, औद्योगिक परिसराला जोडणाऱ्या रस्ते विकासावर भर दिला जाणार असून त्यावर १५२६ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. पुण्याचे दळणवळण गतिमान करण्यासाठी येरवडा ते कात्रज भुयारी मार्ग तयार करण्यात येणार आहे.**



मुंबई येथे झालेल्या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ, पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे पाटील, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, मुख्य लेखापाल पद्मश्री तळेकर आदी उपस्थित होते. या बैठकीमध्ये प्राधिकरणाच्या विविध विषयांवर चर्चा झाली व विषयांना मंजुरी दिली.

**'अर्बन ग्रोथ सेंटर'**

प्रस्तावित नवीन पुरंदर विमानतळ रस्ते जाळ्यांसाठी ६३६.८४ कोटी, रांजणगाव आणि हिंजवडी औद्योगिक क्षेत्रातील सिमेंट रस्त्यांसाठी बैठकीत २०३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला.'अर्बन ग्रोथ सेंटर' करीता रस्त्यांचे जाळे तयार करण्यासाठी १५२६ कोटी रुपयांची तरतूद केली. पुणे शहर वळण मार्ग, पुणे सातारा आणि पुणे नगर रस्त्यापासून पुरंदर विमान तळाला चांगली ' कनेक्टिव्हिटी ' तयार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

**इतिहासात प्रथमच वेळेवर अर्थसंकल्प सादर**

पीएमआरडीएचे मुख्यमंत्री पदसिद्ध अध्यक्ष आहेत. पीएमआरडीएची स्थापना झाल्यानंतर आजपर्यंत कधीही वेळेवर अर्थसंकल्प सादर झाला नाही.

कारण मुख्यमंत्र्यांना पीएमआरडीसाठी वेळ मिळत नसल्याचे कारण सांगितले जात होते. मात्र, नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कालखंडात प्रथमच वेळेवर अर्थसंकल्प सादर झाला आहे.

### ग्रामीण चेहरा बदलणार...

पीएमआरडीएअर्थसंकल्पामध्ये औद्योगिक, तीर्थक्षेत्र, पर्यटन क्षेत्रांना, धरण क्षेत्र भागास जोडणाऱ्या रस्ते विकासावर भर दिला आहे. या अर्थसंकल्पातून पीएमआरडीच्या ग्रामीण भागातील दळणवळण आणि कनेक्टिव्हिटी मदत होणार आहे. त्यामधून ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलण्यास मदत होईल, अशी माहिती पीएमआरडीएचे आयुक्त डॉ योगेश म्हसे पाटील यांनी दिली.

## पिंपरी-चिंचवडमध्ये बुलडोझर पॅटर्न!

# तब्बल 2 हजार 845 अतिक्रमणे हटविली!

### प्रशासनाची माहिती: 2 कोटी 29 हजार चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त

। पिंपरी- चिंचवड ।प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चिखली येथील कुदळवाडी भागात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या मोहिमेअंतर्गत आज अखेरपर्यंत २०२ लाख २९ हजार चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेली २ हजार ८४५ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. गेल्या ५ दिवसांपासून सुरू असलेल्या या मोहिमेदरम्यान ४६५ एकर भूभागावर अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून ही कारवाई यापुढेही चालू राहणार आहे.**




महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली ८ फेब्रुवारी २०२५ पासून कुदळवाडी येथे अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने आणि इतर अनधिकृत बांधकामे हटविण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरू आहे. आज मोहिमेच्या पाचव्या दिवशी, सुमारे ९३ एकर भूभागावर पसरलेल्या ४० लाख ५७ हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या ५२८ अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

आजच्या मोहिमेत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचेता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, महेश वाघमोडे, अजिंक्य येळे, शितल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंते, उपअभियंते आणि कर्मचारी सहभागी झाले. याशिवाय सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली याठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासनासाठी करण्यात आला. तसेच महापालिकेचे ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस कर्मचारी आणि मजूर यांचा देखील यामध्ये समावेश होता. सुरक्षेसाठी ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या.

#### कारवाई सुरूच राहणार...

महापालिका आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त मोहिमेतून कुदळवाडी येथे नियोजित विकास आरक्षणे आणि नागरी सुविधा जागेवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार आहे, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली.

---

## ‘AI’च्या मदतीने बेकायदा होर्डिंगवर ‘वॉच’

### महापालिका प्रशासन: आधुनिक तंत्रज्ञानाचा आता कामकाजात वापर करणार!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी

**उद्योगनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये अनेक कारखाने आहेत. शहराची लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षितता निश्चित करणे, आगीसारख्या आपत्कालीन परिस्थितीवर तत्परतेने नियंत्रण आणणे आणि लोकाभिमुख सार्वजनिक यंत्रणा असणे यासाठी महापालिका विविध उपक्रम राबवीत आहे. त्यामध्ये आता ‘एआय’ तंत्रज्ञानाचीही भर पडणार असून, सौरऊर्जा, वैद्यकीय सुविधा, अनधिकृत होर्डींगवर नियंत्रण ठेवले जाणार आहे.**




चालू वर्षात काही प्रकल्पांच्या उभारणीला प्रारंभ करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. यात मध्यवर्ती अग्निशमन केंद्र व अग्निशमन प्रबोधिनी, आकुर्डीत दहा मजली अग्निशमन केंद्र, वाकड परिसरातील तीन रस्ते आणि पवना नदीवर मामुर्डी ते सांगवडे यांना जोडणारा पूल अशा प्रकल्पांचा समावेश आहे. महापालिका व पुणे महानगर विकास प्राधिकरण यांच्या समान भागीदारी खर्चातून मामुर्डी आणि सांगवडे यांना जोडण्यासाठी पवना नदीवर पूल उभारण्यात येणार आहे.

**ई-प्रशासन संगणक प्रणाली**

स्मार्ट सिटीअंतर्गत ३३ संगणक प्रणाली विकसित केल्या जाणार आहेत. यामध्ये माहिती व्यवस्थापन व विविध प्रक्रिया स्वयंचलित होण्यास मदत होईल. नागरिकांना अधिक दर्जेदार व जलद सेवा मिळेल. ई-ऑफिस संकल्पना अर्थात कागदविरहित कामकाजाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. ऑनलाइन दस्तावेज हाताळण्याच्या प्रक्रियेतील गती, अचूकता, पारदर्शकता आणली जाणार आहे.

**नवीन तालेरा रुग्णालय**

वैद्यकीय सुविधा अधिक सक्षम करणे आणि नागरिकांना अल्पदरात दर्जेदार वैद्यकीय सुविधा देण्यासाठी चिंचवड येथे १५८ खाटांचे सुसज्ज मल्टीस्पेशालिटी तालेरा रुग्णालय चिंचवडमध्ये उभारले आहे. पाच मजली इमारतीत बाह्यरुग्ण, मेडिकल, शस्त्रक्रिया, एनआयसीयू, बालरुग्ण, डायलिसीस, आयसीयू, जनरल वॉर्ड, प्रयोगशाळा, नाक-कान-घसा व ऑर्थो वॉर्ड, कॉन्फरन्स रूम आदी सुविधा असतील.

#### सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प

विजेची बचत करण्यासाठी महापालिका शाळा, इमारती, नाट्यगृहे, रुग्णालयांवर पूर्वी ६३१ किलोवॉट क्षमतेचे सोलर रुफ टॉप प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. आता आठ प्रभागांमिळून ८४ ठिकाणी तीन हजार ९७ किलोवॉट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित केले जात आहेत. यामुळे प्रतिवर्ष चार कोटी ८३ लाख रुपयांची बचत होऊ शकते. ‘अ’ क्षेत्रीय कार्यालय, तारांगण, प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, मोहननगर जिजाऊ सांस्कृतिक भवन, संभाजीनगर शाहू महाराज जलतरण तलाव, वायसीएम रुग्णालय, महापालिका भवन, जलशुद्धीकरण केंद्र, मोरवाडी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हेडगेवार भवन येथे सौरऊर्जा प्रकल्प उभारले आहेत.

# संघ म्हणजे आऽऽरम आणि दक्ष, देशहिताकडे सदा न् कदा लक्ष !

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते सक्रिय झाले की काय घडू शकते, हे गेल्या काही दिवसात हरियाणा, महाराष्ट्र आणि नवी दिल्लीतील निवडणुकीने दाखवून दिले आहे. संघ म्हणजे समर्पण, संघ म्हणजे त्याग, संघ म्हणजे निष्ठा आणि संघ म्हणजे देशहितासाठी, हिंदुत्व हितासाठी वाटेल ते याची प्रचिती गेल्या काही महिन्यात प्रत्येक देशवासीयाने घेतली आहे.**



## संकटकाळी आघाडीवरच..

अखंड देश प्रेमाने प्रेरित झालेली ही संघटना देशापुढे प्रत्येक संकटाच्या वेळी पुढाकार घेत असते आणि त्याचा गौरव प्रत्येक पंतप्रधान करत असतो, हे देखील अवघ्या देशाने पाहिले आहे. देशात कोणत्याही भागांमध्ये महापूर येवो, भूकंप होवो किंवा अगदी अलीकडचा कोरोना सारखा कालखंड असो, संघाचे स्वयंसेवक सर्वात प्रथम तेथे कामालाही लागलेले असतात, ही वस्तुस्थिती झाली.

संघाचे हे देश प्रेम अगदी निस्पृहपणे, निस्वार्थीपणे आणि अव्याहतपणे सुरू असते. देशावर कोणतेही संकट आले की, संघाची लगबग सुरू!

## लव्ह जिहाद आणि व्होट जिहाद

आपल्या देशात नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्व काही सुरळीत सुरू असताना अचानक देशातील सर्व मुस्लिमांनी एकत्र येऊन 'व्होट जिहाद' सुरू केले आणि त्याचा फटका थेट हिंदुत्वालाच बसू लागला. त्याआधी लव्ह जिहादचे संकटही देश अनुभवतो आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मुस्लिम संघटनांनी एकत्र येऊन दाखवलेली ताकद संघावर रुचली नाही आणि त्याचे उट्टे विधानसभा निवडणुकीत काढले गेले.

## निवडणूक ताब्यातच घेतली

अगदी अलीकडील उदाहरण म्हणजे महाराष्ट्र आणि दिल्ली. येथील विधानसभेची निवडणूक संघ परिवाराने अक्षरशः ताब्यातच घेतली. शिस्तबद्ध प्रचार, नियोजनबद्ध प्रत्येक मतदारांशी संपर्क, आणि जास्तीत जास्त मतदान घडवून मुस्लिम विरोधी मते हिंदुत्वाकडे वाढण्यासाठी केलेला आटापिटा आपण अनुभवत आहोत. त्यामुळेच महाराष्ट्रात मुस्लिम धार्जिण्या महाआघाडीचा आणि दिल्लीत केजरीवालांच्या आप पक्षाचा सुपडा साफ झाला..हिंदू एकवटल्यानंतर काय होऊ शकते ते संघाने जगाला दाखवून दिले.

## संघाचा पुढाकार, यश निश्चित

संघ देखील एखाद्या मोहिमेवर निघाला की तो आधी मोठ्या खुबीने, युक्तीने अंदाज बांधत आधी प्रवेश करतो त्यानंतर हळूहळू विरोधकांना पोखरत त्यांच्या भूमिकेचा, कृत्यांचा नायनाट करतो, हिंदुत्वापलीकडे जे जे घडणारे असते, त्यावर हल्ला करून शत्रूला कायमस्वरूपी जेरीस आणतो, संघ स्वयंसेवक केवळ वरकरणी, अतिशय संयमी, शांत असतो, तसा दिसतो.. पण आतून प्रत्येक स्वयंसेवक राष्ट्रप्रेमापोटी पेटून उठलेला असतो, पुढल्या काही वर्षात हेच संघ स्वयंसेवक हे राष्ट्र हिंदुराष्ट्र करून सोडतील, त्यानंतर भलेही त्यांना आणखी काही वर्षे कदाचित लागतील. पण, आधी आशिया खंड त्यानंतर अवघ्या जगात ते नक्कीच हिंदुत्वाचा डंका पेटवून मोकळे होतील, याची खात्री बाळगा.

## संघाची ताकद भाजपाला कळली

संघाशिवाय राज्याच्या कोणत्याही निवडणुका जिंकणे कठीण आहे, हे देवेंद्र फडणवीसांच्या ध्यानात आले किंवा त्यांना ते संघाच्या पदाधिकाऱ्यांकडून श्रेष्ठींकडून ध्यानात आणवून देण्यात आले आणि विधानसभेला मग संघ स्वयंसेवकांवर निवडणूक प्रचाराची मोठी जबाबदारी टाकण्यात आली. त्यांना त्या प्रचारकार्यात जुंपण्यात आले, पुढल्या केवळ काही महिन्यात परिणाम समोर आले. केवळ संघामुळे संपूर्ण राज्यात भाजपासहित अख्ख्या 'महायुती'ला घवघवीत यश मिळाले विशेष म्हणजे प्रचाराची धुरा पेलताना, भूमिका पार पाडताना कुठल्याही संघ सयंसेवकाने हा भाजपा उमेदवार, तो राष्ट्रवादी किंवा सेनेचा उमेदवार असा अजिबात भेदभाव न करता त्यातल्या प्रत्येकासाठी उत्तम नियोजन केले. त्यातून महायुती सत्तेत आलीच पण बलाढ्य शत्रूला त्याचवेळी पूर्णतः जमीनदोस्त करण्यात आले.

## नव्या प्रशासनावर छाप


नव्या मंत्रिमंडळात शासकीय नोकरीत असलेले किंवा नसलेले संघाचे कट्टर शिस्तप्रिय स्वच्छ, कडवे देशभक्त असलेले स्वयंसेवक प्रामुख्याने भाजपा मंत्र्यांनी घ्यावेत, अशा सूचना त्यांना होत्या, ज्या लगेच अमलात आणल्या गेल्या आहेत. यापुढे मंत्री आस्थापनेवर अनेक असंख्य संघ स्वयंसेवक तुम्हाला स्वीय सहाय्यक खासगी सचिव, विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू झाल्याचे कानावर पडेल. प्रखर हिंदुत्व आणि जाज्वल्य देशभक्ती केवळ याच प्रगत विचारातून हा स्वागतार्ह बदल कधी नव्हे, तो उभ्या राज्याला सुखद धक्का देणारा आहे.

संघ, भाजपा केवळ प्रखर देशभक्तीला महत्व देतो. प्रसंगी त्यांचा कडवा स्वयंसेवक जरी बेशिस्त वागायला लागला आणि तो राजकीयदृष्ट्या कितीही महत्वाचा किंवा ताकदवान असला तरी कट्टर संघ आणि त्यातून तयार झालेले भाजपावाले या पद्धतीच्या नेत्यांचा एका क्षणात विनोद तावडे, एकनाथ खडसे करून मोकळे होतात, हा इतिहास अगदी ताजा आहे.

## फडणवीस म्हणजे ज्युनियर मोदीच !

आजतागायतच्या समस्त मंत्रिमंडळात किंवा मंत्र्यांच्या सभोवताली तेच ते चेहरे पाहायला मिळायचे, जे केवळ देशबुडवे आणि राज्य लुबाडणारे, दलाली पद्धतीचे मंत्री आस्थापनेवर पाहायला मिळायचे, यावेळी पहिल्यांदा केवळ राष्ट्रप्रेमातून हा बदल देवेंद्र फडणवीसांनी घडवून आणलेला आहे. फडणवीसांना त्यामुळेच सध्या आणि यापुढे ज्युनियर मोदी असे संबोधले जाणार आहे. त्यामुळे 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' हीच यावेळी मुख्यमंत्री म्हणून फडणवीसांची भूमिका असल्याने त्यांच्याही सभोवताली कळत नकळत जी नावे कानावर पडायची, फडणवीसांनी त्या समस्त मंडळींना दूर केले आहे.

## ...नाम हे सत्स्वरूप आहे।



अध्यात्म

नाम हे रूपापेक्षा निश्चित श्रेष्ठ आहे; त्यामुळे रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. रूप हे जड आणि दृश्य असल्यामुळे उत्पत्ती, स्थिती आणि विनाश, वाढ होणे आणि घटणे, जागा व्यापणे आणि जागा बदलणे, कालमानाने फरक पडणे इत्यादि बंधने त्याला असतात; पण नाम हे दृश्याच्या पलीकडे आणि सूक्ष्म असल्यामुळे त्याला उत्पत्ती आणि विनाश, वाढ आणि घट, देशकालनिमित्ताच्या मर्यादा, इत्यादि कोणतेही विकार नाहीत. नाम हे सत्स्वरूप आहे. नाम हे रूपापेक्षा व्यापक असते. व्यापक वस्तूचे क्षेत्र मोठे असल्याने तिच्यामध्ये शक्तीदेखील अधिक असते. जिच्यामध्ये शक्ती जास्त असते ती वस्तू अधिक स्वतंत्र असते. जी वस्तू अधिक स्वतंत्र असते तिला बंधने किंवा मर्यादा कमी असतात. म्हणून नाम हे रूपापेक्षा अधिक व्यापक, अधिक शक्तिमान, अधिक स्वतंत्र आणि अधिक बंधनरहित असते.

आपली ज्ञानक्रिया कशी चालते ते पाहू. आपण एका टेकडीवर उभे राहून सृष्टिसौंदर्य पाहिले. त्या पाहण्यात कोणकोणत्या क्रिया होतात पाहा. प्रथम डोळ्यांमधून प्रकाश-किरणे आत गेली. बाह्य पदार्थांचे मनुष्याला ज्ञान व्हायला इंद्रिये हे पहिले साधन आहे. इंद्रियांमधून आत आलेले संस्कार एकत्र करून मन त्यांना वस्तूस्वरूप देते. वस्तूस्वरूप तयार झाल्यावर, बुद्धी सारासार विचार करून त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान आपल्याला करून देते. पण मनुष्याच्या बुद्धीचा व्यापार इथेच थांबत नाही. टेकडीवरून आजूबाजूला पाहात असताना झाडे, वेली, घरे, बागा, माणसे, पक्षी, पाण्याचे तलाव इ. सर्व वस्तूंचे ज्ञान झाल्यावर पुन्हा त्यांचे एकीकरण होऊन, 'ही सृष्टीची शोभा आहे' असे ज्ञान आपल्याला होते. म्हणजे अनेकांत एकत्व शोधणे हेच मानवी ज्ञानाचे लक्षण आहे. या जगामध्ये कितीतरी वैचित्र्य आढळते. नाना तऱ्हेचे दगड, नाना तऱ्हेचे किडे, नाना प्रकारचे पक्षी, प्राणी या सर्वांची नावे जरी भिन्न असली तरी त्या सर्वांमध्ये 'असणेपणाचा' गुण आहे; म्हणजे, सजीव प्राणी झाला तरी तो 'आहे', आणि निर्जीव वस्तू झाली तरी तीही 'आहे'. एवढेच काय, पण आनंदालासुद्धा 'आहेपणा'चा गुण आहे. या 'असणेपणा'च्या गुणाला 'नाम' असे म्हणतात. यालाच 'ॐकार' असे म्हणतात. 'ॐकारांतून सर्व सृष्टी उगम पावली. ॐकार हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. अर्थात, नाम म्हणजे सत् होय. म्हणूनच नाम हे सृष्टीच्या आरंभी होते, ते सध्या आहेच, आणि सृष्टीचा लय झाला तरी ते शिल्लक राहणारच. नाम म्हणजे ईश्वर होय. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. रूप हे नामाहून निराळे राहू शकत नाही. नाम हे रूपाला व्यापून पुन्हा शिल्लक उरते.

**बोधवचन:-** नाम हे शाश्वत आहे. ते पूर्वी टिकले, आता आहे, आणि आपण गेल्यावर ते राहणार आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# 'जलजीवन'नंतरही 15 जिल्ह्यांवर टंचाईचे संकट!

## यंदाच्या उन्हाळ्यात पाणीपुरवठ्यासाठी
## 15 जिल्ह्यांमध्ये पाच हजारांवर टँकर लागतील

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी

**राज्यातील ४० हजार २९७ गावांमधील दीड कोटी कुटुंबांना 'हरघर जल' योजनेअंतर्गत जलजीवन मोहिमेमधून पिण्याच्या पाण्यासाठी नळ जोडणी दिली जाते. 'जलजीवन'च्या कामावर आतापर्यंत १५ हजार कोटींचा खर्च झाला आहे. तरीदेखील यंदाच्या उन्हाळ्यात पाणीपुरवठ्यासाठी १५ जिल्ह्यांमध्ये पाच हजारांवर टँकर लागतील, अशी स्थिती आहे. टंचाई आराखड्याद्वारे तशी मागणी राज्य सरकारला कळविली जात आहे.**



केंद्र सरकारच्या 'हर घर नल' योजनेतून प्रत्येक घराला प्रतिमाणसी नळाद्वारे ५५ लिटर पाणी देण्यासाठी जलजीवन मोहिमेचे काम हाती घेण्यात आले. योजनेला २०१९ मध्ये सुरुवात झाली होती. तिचा कालावधी २०२४ मध्येच संपला. पण कामे अपूर्ण राहिल्याने २०२८ पर्यंत मुदतवाढ द्यावी लागली.

तोपर्यंत टंचाई काळात विशेषतः उन्हाळ्यातील पाणीपुरवठ्यासाठी टँकरवर कोट्यवधींचा खर्च करावा लागेल, अशी परिस्थिती राज्यात आहे. २३४ गावांमध्ये अजूनही कामे सुरू झालेली नाहीत. सुमारे १६ हजार ९४ गावांमधील कामे निधीअभावी कमी-अधिक प्रमाणात सुरु असल्याचे योजनेच्या अहवालात नमूद केलेले आहे तर ४० हजार २९७ गावांपैकी आतापर्यंत ११ हजार ८९२ गावांनीच नळ जोडणी पूर्ण झाल्याचे कळविले आहे.

राज्यातील सुमारे २८ हजार गावांमधील 'जलजीवन' अजूनही अर्ध्यावरच आहे. त्यासाठी ठेकेदारांकडून विलंब, कामांबद्दल तक्रारी, ठेकेदारांची बिले प्रलंबित आणि राज्य सरकारकडे निधी उपलब्ध नसल्याच्या बाबी कारणीभूत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत मार्च २०२६ पर्यंत राज्यातील शंभर टक्के कृषिपंपाला वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. त्यासाठी तब्बल १६ हजार मेगावॉटचे लहान क्षमतेचे सौर प्रकल्प उभारण्यासाठी वेगवेगळ्या कंपन्यांना कंत्राट दिले गेले आहे. त्यामुळे शंभर टक्के शेतकऱ्यांच्या पंपाला हरित ऊर्जा पुरवणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

या योजनेतून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून, औद्योगिक ग्राहकांवर 'क्रॉस सबसिडी'च्या रूपाने पडणारा भार हलका होणार आहे. राज्यात जवळपास ४६ लाख कृषिपंपधारक शेतकरी आहेत. त्यांना महावितरणकडून वीजपुरवठा केला जातो. महावितरणच्या एकूण वीज वितरणाचा विचार करता ३० टक्के वीज कृषिपंपाला पुरवली जाते. ही वीज सवलतीच्या दराने पुरवता यावी, म्हणून औद्योगिक ग्राहकांवर 'क्रॉस सबसिडी' अधिभार लावला जातो. याची दखल घेत राज्य सरकारने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत ग्रामीण भागात दोन ते दहा मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारून कृषिपंपांना वीजपुरवठा केला जातो.

### अल्प वीजदर...

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत उभारल्या जाणाऱ्या सौर प्रकल्पातून तयार होणाऱ्या प्रतियुनिट विजेचा दर २.६९ रुपये ते ३.१० रुपये एवढा कमी असणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अल्पदरात दिवसा वीज उपलब्ध होऊ शकणार आहे. त्याचबरोबर उद्योगांवर 'क्रॉस सबसिडी'चा वर्षाला १३ हजार कोटी रुपयांचा पडणारा भार हलका होणार आहे.

---

# शिवसेनेचे कोकणात 'ऑपरेशन टायगर'

## राजन साळवी यांचा राजीनामा: शिवसेना शिंदे गटात आज प्रवेश करणार

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी

**रत्नागिरी जिल्ह्यातील राजापुर लांजा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार राजन साळवी यांनी अखेर शिवसेना ठाकरे गटाला धक्का देत उपनेते पदाचा राजीनामा दिला आहे. गुरुवारी दुपारी साळवी शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे निश्चित झाले आहे.**



विधानसभा निवडणुकीतील पराभवा नंतर नाराज राजन साळवी हे भाजपात जाण्याची जोरदार चर्चा होती. मात्र त्यांनी शिंदे गटाची कास धरण्याचा निर्णय घेतला आहे. गेले काही दिवस शिवसेना ठाकरे पक्षाला सोडचिठ्ठी देण्याची चर्चा असलेले माजी आमदार साळवींनी ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेतेपदाचा राजीनामा देत शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' केला आहे. ते उद्या गुरुवारी दुपारी तीन वाजता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. कोकणात ठाकरे गटासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. त्यामुळे कोकणात 'ऑपरेशन टायगर'ला सुरुवात झाल्याची चर्चा पुन्हा जोर धरु लागली आहे.

कोकणातील शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार राजन साळवी हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा काही काळासाठी चांगलीच रंगली होती. भाजपमधील प्रवेशाच्या चर्चेबाबत मात्र साळवींनी थेट बोलणे टाळले होते. 'मी बाळासाहेबांचा लाडका शिवसैनिक आहे. त्यांना अभिप्रेत असलेले काम मी आजपर्यंत केले आणि त्यांच्याच विचारांचे काम मी पुढे नेणार आहे,' असे सांगितले होते. मात्र मालमत्ते बाबत पोलिसांकडून वारंवार होणारी चौकशी आणि पक्ष संघटनेतील अंतर्गत वादाला कंटाळून ठाकरे गटाला सोडत असल्याचे सांगण्यात येत आहे.

माजी आमदार राजन साळवी यांनी नगरसेवक, नगराध्यक्ष, जिल्हाप्रमुख, तीन वेळा आमदार, आता उपनेता अशा विविध पदांवर काम केले आहे. त्यामुळे साळवी यांच्यासारख्या मोठ्या नेत्याचा शिवसेनेमध्ये प्रवेश झाल्यास कोकणात महायुतीची ताकद वाढणार आहे. माजी आमदार राजन साळवी यांना विधान परिषदेवर संधी मिळण्याची शक्यता असून त्यांना तसा शब्द देण्यात आल्याची चर्चा आहे.

### सत्ताधारी ब्लॅकमेलर : अंधारे



'राजन साळवी ज्येष्ठ नेते असून कोकणात त्यांची मोठी ताकद आहे. गेल्या दोन अडीच वर्षांपासून राजन साळवींना त्रास होतोय. सातत्याने त्यांना एसीबीच्या धाडी आणि ईडीच्या नोटीसा असतील किंवा त्यांच्या पत्नीची थेट चौकशी करणं यासोबत त्यांच्या देवघरात जाऊन त्यांच्या देवाच्या मूर्त्या तपासणं आणि त्या किती किमतीच्या आहेत हे तपसाणं, हे अत्यंत गलिच्छ प्रकारचं आहे', असं सुषमा अंधारे म्हणाल्या. तर भाजपची आणि शिंदे गटाची अशी गलिच्छ प्रवृत्ती झालीय. हे ऑपरेशन टायगर नसून हे ऑपरेशन ब्लॅकमेलर म्हणतात. हे असेच ब्लॅकमेलर लोक आहेत जे ब्लॅकमेल करतात, जे लोकं त्यांच्याकडे जातात त्यांना क्लिन चीट मिळते, असं म्हणत सुषमा अंधारे यांनी भाजपसह शिंदे गटावर सडकून टीकास्त्र डागलें आहे.

# 'मेटा'ने सुरु केली कर्मचारी कपात!

## मार्क झुकरबर्गच्या निर्णयाने : जगभरातील 3600 कर्मचाऱ्यांना बसणार फटका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी

**फेसबुकची पालक कंपनी मेटाने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत ५% कपात करण्याचा निर्णय घेतला असून, त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे. यामुळे युरोप, आशिया आणि अमेरिकेतील ३,६०० हून अधिक कर्मचाऱ्यांना फटका बसणार आहे. मेटाने कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या अंतर्गत मेमोमध्ये, म्हटले आहे की, "ही कपात कामगिरीवर आधारित आहे, ज्या कर्मचाऱ्यांनी अपेक्षा पूर्ण केल्या नाहीत त्यांना कपात करण्यात येणार आहे."**




दरम्यान, या निर्णयाचा फटका बसलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या या निर्णयाला आव्हान दिले आहे. कर्मचाऱ्यांनी असा दावा केला आहे की, त्यांनी कधीच नकारात्मक कामगिरी केलेली नाही. त्यापैकी मेटावर्क्समधील माजी उत्पादन सल्लागार एलाना रेमन सॅफनर आहेत, ज्यांना कंपनीत तीन वर्षांहून अधिक काळ काम केल्यानंतर या आठवड्याच्या सुरुवातीला त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले. याबाबत बिझनेस इनसाइडरने वृत्त दिले आहे.

### जानेवारीत केली होती कर्मचारी कपातीची घोषणा

जानेवारीमध्ये मेटाने ३६०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याची तयारी करत असल्याचे वृत्त समोर आले होते. आता कंपनीने त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे. कंपनी आता काढून टाकलेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी नवीन लोकांना नियुक्त करण्याची शक्यता आहे. फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅपची मालकी असलेल्या मेटा कंपनीने म्हटले आहे की, सीईओ मार्क झुकरबर्ग यांच्या निर्णयाचा परिणाम त्यांच्या पाच टक्के कर्मचाऱ्यांवर होईल. सप्टेंबरपर्यंत मेटामध्ये सुमारे ७२,४०० कर्मचारी होते, आता त्यामध्ये मोठी घट होणार आहे.

### महिला कर्मचाऱ्याची पोस्ट व्हायरल

नोकरीवरून काढल्यानंतर अमेरिकेतील एलाना रेमन सॅफनर यांनी लिंक्डइन पोस्टमध्ये मेटावर टीका केली आणि दावा केला की त्यांना काढून टाकण्याचा निर्णय त्यांच्या कामगिरीवर आधारित नव्हता. सहा महिन्यांच्या प्रसूती रजेवरून परतल्यानंतर, काही आठवड्यांनी त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले. असा दावा एलाना रेमन सॅफनर यांनी लिंक्डइनवर पोस्टमध्ये केला आहे.

दरम्यान, मेटाने खराब कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना काढून टाकणार असल्याचे म्हटेल होते. पण, त्यांनी विशेषतः अलिकडच्या काळात रजा घेणाऱ्या लक्ष्य केले आहे. मेटाने रेमन यांना कधीही खराब कामगिरीचे रेटिंग दिले नव्हते, त्यामुळे कंपनीने अचानक त्यांना कामावरून काढून टाकण्याच्या निर्णयाने त्यांना धक्का बसला आहे.

### कोणत्या देशांत कर्मचाऱ्यांवर परिणाम?

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारपासून (10 फेब्रुवारी 2025) अमेरिकेसह (AMERICA) अनेक देशांमध्ये ही नोकरकपात करण्यात येणार आहे. मात्र, जर्मनी (GERMANY), फ्रान्स (FRANCE), इटली (ITALY) आणि नेदरलँड्स (NETHERLANDS) सारख्या देशांमध्ये कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही, कारण तेथील स्थानिक कामगार कायदे (LOCAL LABOR LAWS) याची अंमलबजावणी करण्यास परवानगी देत नाहीत. युरोप (EUROPE), आशिया (ASIA) आणि आफ्रिकेतील (AFRICA) अनेक देशांमध्ये 11 फेब्रुवारी ते 18 फेब्रुवारीदरम्यान कर्मचाऱ्यांना नोटीस (NOTICE) पाठवण्यात येणार आहेत.

# अयोध्यातील महंत सत्येंद्र दास यांचे निधन

## मुख्यमंत्री योगी यांनी वाहिली आदरांजली: वयाच्या 85 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी

**अयोध्येतील राम मंदिरातील मुख्य पुजारी आचार्य महंत सत्येंद्र दास यांचे बुधवारी वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. संजय गांधी पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. स्ट्रोकचा झटका आल्यामुळे ३ फेब्रुवारी रोजी त्यांना सुरुवातीला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र नंतर त्यांना लखनऊच्या एसजीपीजीआय रुग्णालयात आणण्यात आले.**



मंगळवारी (११ फेब्रुवारी) उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यानी लखनऊमधील रुग्णालयात येऊन त्यांच्या प्रकृतीबद्दल माहिती घेतली होती. सत्येंद्र दास गेल्या काही काळापासून मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचा सामना करत होते.

६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशिदीचा ढाचा कोसळण्याच्या आधीपासून आचार्य सत्येंद्र दास राम मंदिरात पुजारी म्हणून काम करत होते. नऊ महिन्यांपूर्वी जेव्हा राम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले, तेव्हा त्यांनी पुन्हा एकदा पदाचा ताबा घेतला होता.

निर्वाणी आखाड्याचे सदस्य असलेल्या सत्येंद्र दास यांनी वयाच्या २० वर्षी आध्यात्मिक प्रवासाची सुरुवात केली होती.

आचार्य सत्येंद्र दास यांना ३ फेब्रुवारी रोजी संजय गांधी पीजीआय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते. ब्रेन स्ट्रोकसोबतच त्यांना मधुमेह आणि उच्च रक्तदाबाची समस्या होती.

### सत्ताधारी ब्लॅकमेलर : अंधारे

६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडण्यात आली तेव्हा सत्येंद्र दास तात्पुरत्या राम मंदिराचे पुजारी होते. राम मंदिराचे सर्वात जास्त काळ मुख्य पुजारी राहिलेले सत्येंद्र दास यांनी आध्यात्मिक जीवनाचा पर्याय निवडला. तेव्हा ते फक्त २० वर्षांचे होते. अयोध्येत आणि इतर राज्यात देखील त्यांचा मोठ्याप्रमाणात आदर केला जातो. त्यांच्या निधनामुळे अनेकांना मोठा धक्का बसला. निर्वाणी आखाड्याशी संबंधित असलेले सत्येंद्र दास हे अयोध्येतील सर्वात सुलभ संतांपैकी एक होते. अयोध्या आणि राम मंदिरातील घडामोडींबद्दल माहिती मिळवण्यासाठी देशभरातील अनेक माध्यमांशी संपर्क साधणारे ते एक व्यक्ती होते. ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडण्यात आली तेव्हा त्यांनी ९ महिने मुख्य पुजारी म्हणून काम करत होते. सत्येंद्र दास यांनी नेहमीच राम मंदिर चळवळ आणि पुढील वाटचालीबद्दल माध्यमांच्या सर्व प्रश्नांची संयमाने उत्तरे दिली.

# मखिजा, चंचलानी यांनी जबाबात काय सांगितले!

INDIA'S GOT LATENT ROW या कार्यक्रमावरुन वाद झाला आहे. या कार्यक्रमात रणवीर अलाहाबादियाने एक वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. यावरुन चांगलाच वाद निर्माण झाला. या वक्तव्याचे पडसाद संसदेतही उमटले. तसंच या शोवरुन रणवीर अलाहाबादियाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. एवढंच नाही अपूर्वा मखिजा, आशिष चंचलानी यांनाही पोलिसांनी चौकशीसाठी बोलवलं होतं. पोलिसांना त्यांनी काय सांगितलं? हे आता समोर आलं आहे.

**रणवीर अलाहाबादियाने नेमकं काय म्हटलं होतं?**

इंडियाज गॉट लेटेंट नावाच्या शोमध्ये रणवीर अलाहाबादियाने वादग्रस्त वक्तव्य केलं ज्यानंतर वादाला तोंड फुटलं. रणवीर अलाहाबादियाने एका स्पर्धकाला प्रश्न विचारला की तुला तुझ्या



पालकांना आयुष्यभर सेक्स करताना पाहायला आवडेल की तुला त्यांच्याबरोबर सामील होऊन ते कायमचं थांबवायला आवडेल? त्याच्या या प्रश्नावर समय रैनाने सर्व त्याच्या पॉडकास्टचे रिजेक्ट झालेले प्रश्न असल्याचे म्हटले. रणवीरच्या याच प्रश्नामुळे त्याच्या अडचणी वाढल्या आहेत. या सगळ्यानंतर रणवीरने माफीही मागितली. मात्र त्याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. अपूर्वा मखिजा आणि आशिष चंचलानी यांनी काय सांगितलं?

सोशल मीडिया इन्फ्लुएन्स अपूर्वा मखिजा आणि युट्यूबर आशिष चंचलानी या दोघांचाही जबाब पोलिसांनी नोंदवला. समय रैनाच्या इंडियाज गॉट लेटेंट शोमध्ये ज्या काही अश्लील कमेंट्स करण्यात आल्या त्यावरुन बराच वादंग झाला होता. यानंतर पोलिसांनी अपूर्वा मखिजा आणि आशिष चंचलानी या दोघांनीही जबाब नोंदवण्यासाठी बोलवलं होतं. या दोघांचे जबाब पोलिसांनी नोंदवले. या दोघांनीही सांगितलं की सदरचा शो हा स्क्रिप्टेड वगैरे काहीही नव्हता. या कार्यक्रमात सहभागी झालेले स्पर्धक आणि जजेस हे उत्स्फुर्तपणे बोलत होते.

# कतरीनाने लगावल्या 20 कानशिलात..!



अभिनेत्री कतरिना कैफ हिला आज कोणत्या ओळखीची गरज नाही. अभिनेत्रीने अनेक सिनेमांमध्ये एकापेक्षा एक भूमिका साकारत चहात्यांच्या मनावर आणि बॉलीवूडवर राज्य केलं. कतरिना कैफ हिने अनेक प्रसिद्ध आणि लोकप्रिय अभिनेत्यांसोबत स्क्रीन शेअर केली आहे. एवढंच नाही तर बॉलीवूडच्या तीन खान यांच्यासोबत देखील कतरीना कैफ हिने अनेक सिनेमांमध्ये काम केलं. बॉलिवूडमध्ये करिअर करत असताना कतरिना सोबत अशा अनेक गोष्टी घडल्या ज्या अनेक वर्षांनंतर समोर आल्या. तिच्या आयुष्या असाच एक किस्सा आज जाणून घेवू. जेव्हा कतरिना हिने प्रसिद्ध अभिनेत्याला 1-2 नाही तर, 20 कानशिलात लगावल्या. हा किस्सा आहे 2011 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मेरे ब्रदर की दुल्हन' सिनेमातला. सिनेमात कतरिना हिने अभिनेता इमरान खान आणि पाकिस्तानी अभिनेता अली जफर याच्यासोबत स्क्रिन शेअर केली होती. सिनेमा प्रदर्शित होऊन 14 वर्ष झाली आहेत. सिनेमाचं दिग्दर्शन अली अब्बास यांनी केलं आणि सिनेमाची निर्मिती आदित्य चोप्रा यांनी केली.

दरम्यान, एका मुलाखतीत कतरिना हिने सिनेमातील सीनबद्दल सांगितलं. 'सिनेमात मला इमरान खान याला कानशिलात मारायची होती. पण माझ्यासाठी ते फार कठीण होतं. सीन शूट होत होता, पण माझ्याकडून सीन काही हवा तसा होत नव्हता.' 'सीनमध्ये मी आणि इमरान आमने सामने होतो... पण माझे प्रयत्नच सुरु होते. जोपर्यंत सीन चांगला होत नाही, तोपर्यंत मला तो सीन करायचा होता. असं करताना मी इमरानच्या 20 वेळा कानशिलात लगावल्या. तेव्हा इमरानची प्रचंड वाईट अवस्था झाली होती. पण अखेर तो सीन परफेक्ट झाला आणि एक न विसरता येणारी आठवण सोबत राहिली.' असं कतरिना म्हणाली.

# गिरीजा प्रभू आता करतेय तरी काय?

वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका करण्यासाठी कधीकधी कलाकारांना बराच काळ थांबावं लागतं. त्यातही एकाच कलाकृतीत असा योग येणं दुर्मीळच. मात्र ही संधी काहींना मिळते आणि ते या संधीचं सोनं करतात. अशा कलाकारांपैकी एक म्हणजे गिरीजा प्रभू. तिला तिच्या पदार्पणातील मालिकेतच म्हणजे 'सुख म्हणजे नक्की काय असतं'मध्ये दोन वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका साकारायला मिळाल्या. या लोकप्रिय मालिकेनं काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांचा निरोप घेतला. या मालिकेत गिरीजानं पूर्वार्धात गौरी आणि उत्तरार्धात नित्या अशा दोन वेगळ्या धाटणीच्या व्यक्तिरेखा साकारल्या होत्या. ही दोन्ही पात्रं तशी संवेदनशील, गंभीर स्वरुपाची होती. त्यामुळे आता ती विनोदी भूमिकेच्या शोधात असल्याचं सांगते.

# सईला अलाहबादिया वादाचा धसका!

युट्यूबर रणवीर अलाहबादियाच्या अश्लील कमेंटनंतर समय रैनाचा 'इंडियाज गॉट लॅटेंट' हा शो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मुंबई पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला असून सायबेर सेलकडून अशी माहिती समोर आली आहे की, आतापर्यंत ३०-४० लोकांविरोधात FIR नोंदवण्यात आला. शिवाय समयच्या या शोमध्ये रणवीरसह सहभागी झालेल्या अपूर्वा मखिजा, आशिष चंचलानी यांनी जबाबही नोंदवला आहे. याशिवाय भारती सिंह, उर्फी जावेद, राखी सावंत, दीपक कलाल, रॅपर रफ्तार, हर्ष लिम्बाचियासह या शोमध्ये परिक्षक म्हणून आलेल्या सेलिब्रिटींना समन धाडण्यात आले. हे प्रकरण संसदेतही चर्चेत आले. या घटनेचा मराठी युट्यूब चॅनेल असणाऱ्या भाडिपाने धसका घेतला असून, त्यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. 'भारतीय डिजिटल पार्टी' म्हणजेच 'भाडिपा' या युट्यूब चॅनेलवर 'अतिशय निर्लज्ज कांदेपोहे' हा कार्यक्रम अलीकडेच सुरू झाला होता. या शोचा पहिला एपिसोड अभिनेत्री भाग्यश्री लिमयेसह पार पडला होता. आता १४ फेब्रुवारी रोजी प्रसारित होणाऱ्या एपिसोडमध्ये सुपरस्टार सई ताम्हणकर सहभागी होणार होता. मात्र इंडियाज गॉट लॅटेंटच्या प्रकरणामुळे 'तापलेल्या वातावरणात' भाडिपाने हा शो पुढे ढकलला आहे.



# कॉमेडियन भारती सिंगने समय रैनाला दिला होता फुल्ल सपोर्ट!

मुंबई: कॉमेडियन समय रैनाचा 'इंडियाज गॉट लॅटेंट' हा कॉमेडी शो मोठ्या वादात सापडला आहे. रणवीर अलाहबादियाने त्याच्या शोमध्ये सहभागी झाल्यानंतर अश्लील प्रश्न विचारला आणि त्यावर लोकांच्या रागाचा भडका उडाला आहे. याप्रकरणी ३० ते ४० जणांविरोधात FIR नोंदवण्यात आला, तर अलीकडेच समय रैनाने IGL चे सर्व व्हिडिओ डिलीट करत असल्याचे आणि पोलीस एजन्सींना संपूर्ण सहकार्य करणार असल्याची माहिती देणारी इन्स्टाग्राम पोस्ट शेअर केली. या सर्व गोंधळात कॉमेडियन भारती सिंगचे एक विधान चर्चेत आले, जेव्हा तिने समय रैनाच्या विनोदाचे समर्थन केले होते. रणवीरने समय रैनाच्या शोमध्ये पालकांबद्दल केलेल्या अश्लील टिप्पणीबद्दल सोशल मीडिया, राजकीय आणि चित्रपट वर्तुळातील व्यक्तींमध्ये संतापाचे वातावरण आहे. या भागानंतर 'इंडियाज गॉट लॅटेंट'च्या आतापर्यंतच्या सहाही भागांमध्ये दिसलेल्या सर्व परिक्षकांविरोधात एफआयआर दाखल करण्यात



आला. मुंबई पोलिसांनी भारती सिंग, उर्फी जावेद, राखी सावंत, दीपक कलाल, रॅपर रफ्तार, हर्ष लिंबाचिया यांच्यासह सर्व ३०-४० आरोपींना समन बजावले आहेत. एकीकडे या शोमधील कंटेंटवर टीका होतेय, तर दुसरीकडे उर्फी जावेद आणि राखी सावंत या सेलिब्रिटींनी IGLचे समर्थन करणाऱ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. या दरम्यान भारतीने यापूर्वी एकदा समय आणि त्याच्या शोच्या समर्थनार्थ दिलेले वक्तव्य चर्चेत आले आहे. ती 'इंडियाज गॉट लॅटेंट'मध्ये पती हर्ष लिंबाचिया आणि गायक टोनी कक्करसोबत दिसली होती.

**तुम्ही समयचे चाहते व्हाल'**

या शोनंतरच भारतीने समयचे कौतुक करणारी प्रतिक्रिया दिली होती. तिने असे म्हटलेले की, 'तो शो असाच आहे, पण शोची जी आवश्यकता आहे, तेच तुम्ही बोलले पाहिजे असे काही नाही. ती तुमची इच्छा आहे, तुम्ही बोला किंवा बोलू नका. समय तुम्हाला सांगणार नाही की, अरे तोंड उघडा. तो एक चांगला मुलगा आहे आणि प्रतिभावान आहे. तो जेन झीचा आवडता आहे, जर तुम्ही तिथे गेलात तर तुम्ही त्याचे चाहते व्हाल, इतका तो चांगला आहे'.

# भारताचा वनडेत इंग्लंडला क्लिन स्वीप!

## चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडिया सज्ज: तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत 3:0 धुव्वा




।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।प्रतिनिधी

**भारताने तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत इंग्लंडचा 3-0 ने पराभव केला. तिसऱ्या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकली आणि भारताला फलंदाजीचं निमंत्रण दिलं. या सामन्यात भारताची सुरुवात अडखळत झाली. अवघी एक धाव करून रोहित शर्मा बाद झाला. पण त्यानंतर शुबमन गिल आणि विराट कोहली यांनी मोर्चा सांभाळला. शुबमन गिलने वनडे क्रिकेटमधील सातवं शतक ठोकलं. तसेच चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी चांगल्या फॉर्मात असल्याचं दाखूवन दिलं. विराट कोहलीला शेवटच्या सामन्यात सूर गवसला. त्याच्या अर्धशतकी खेळीमुळे चॅम्पियन्स ट्रॉफीत त्याच्याकडून अपेक्षा वाढल्या आहेत. श्रेयस अय्यरनेही मधल्या फळीत चांगली फलंदाजी करत अर्धशतक ठोकलं. भारताने 50 षटकात सर्व गडी गमवून 356 धावा केल्या आणि विजयासाठी 357 धावांचं आव्हान दिलं. हे आव्हान काही इंग्लंडला गाठता आलं नाही. त्यामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत 3-0 ने पराभव सहन करावा. इंग्लंडने षटकात सर्व गडी गमवून 214 धावा केल्या. भारताने तिसरा सामना 142 धावांनी जिंकला.**

भारताने विजयासाठी दिलेल्या 357 धावांचा पाठलाग करताना इंग्लंडच्या आघाडीच्या फलंदाजांनी चांगली सुरुवात केली होती. फिलीप सॉल्ट आणि बेन डकेट यांनी पहिल्या विकेटसाठी 60 धावांची भागीदारी केली. तर टॉम ब्रॅंडनने सॉल्टसह ही भीदारी वाढवली. पण त्यानंतर घसरगुंडी सुरु झाली. मधल्या फळीतील फलंदाज सपशेल फेल ठरले. जो रूट, जोस बटलर स्वस्तात बाद झाले. इंग्लंडच्या अशा खेळीमुळे चॅम्पियन्स ट्रॉफी चांगल्या खेळीच्या अपेक्षा आता मावळल्या आहेत. इंग्लंडचा संघ भारताच्या गटात नाही. पण इंग्लंडने उपांत्य फेरीत धडक मारली तर भारताशी सामना होऊ शकतो.

**दोन्ही संघांची प्लेइंग 11**

**भारत (प्लेइंग इलेव्हन):** रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (विकेटकीपर), हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, हर्षित राणा, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग.

**इंग्लंड (खेळणारा इलेव्हन):** फिलिप साल्ट (विकेटकीपर), बेन डकेट, टॉम बँटन, जो रूट, हॅरी ब्रूक, जोस बटलर (कर्णधार), लियाम लिव्हिंगस्टोन, गस ॲटकिन्सन, आदिल रशीद, मार्क वूड, साकिब महमूद.

### कर्णधार रोहित शर्मा म्हणाला...



कर्णधार रोहित शर्मा म्हणाला की, 'आम्ही ज्या पद्धतीने या मालिकेत खेळलो ते पाहून खूपच आनंदी आहे. आम्हाला येणाऱ्या आव्हानासाठी सज्ज होतो. आम्ही या मालिकेत काय चूक केली असं मला वाटत नाही. काही क्षुल्लक गोष्टी आम्ही सुधारण्याचा प्रयत्न करतोय. पण त्या गोष्टी काय आहेत ते इथे उभं राहून सांगणार नाही. संघ सातत्यपूर्ण चांगली काम करत आहे. आम्ही ते सातत्य ठेवण्याचं काम करत आहोत. आमच्यातील संवादही स्पष्ट आहे. अर्थातच कोणताही चॅम्पियन संघ प्रत्येक सामन्यात सुधारणा करू इच्छितो आणि तेथून पुढे जाण्याचा प्रयत्न असतो.'

# एक किक आणि झटक्यात गोल...

## इंडियन टायगर्स अँड टायग्रेसेस फुटबॉल ट्रायल्सची दणक्यात सुरुवात

।नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंडियन टायगर्स अँड टायग्रेसेस अभियानाची सुरुवात झाली आहे. अनेक प्रतिभावंत या अभियानात सामील झाले आहेत. हा पॅन इंडिया कार्यक्रम देशभरातील यंगस्टर्सना ऑस्ट्रियात सर्वश्रेष्ठांसोबत ट्रायल करण्याची एक सुवर्णसंधी देत आहे. ट्रायल्सची 12-14 आणि 15-17 वयोगटात विभागणी करण्यात आली आहे. यात दिल्ली, जम्मू-काश्मीर, लखनऊ आणि मणिपूरसारख्या शहरातील तरुण आणि तरुणींनी भाग घेतला आहे. ट्रायल्स सुरू होण्यापूर्वी दिल्ली सॉकर असोसिएशनचे अध्यक्ष आणि सुदेवा एफसीचे मालक अनुज गुप्ता यांनी स्पर्धकांचं स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.**

दिल्ली कॅम्पमध्ये 500 हून अधिक तरुण सहभागी झाले होते. यात 100 हून अधिक तरुणी होत्या. 12-14 वयोगटातील ग्रुपची ट्रायल्स सकाळी अत्यंत उत्साहात सुरू झाली. खेळाडूंची चार गटात विभागणी करण्यात आली. प्रत्येक टीम फॉरवर्ड, मिडफिल्डर, डिफेंडर आणि गोलकिपर आहे की नाही हे सुनिश्चित करण्यात आलं. खऱ्याखुऱ्या सामन्यासारखं वातावरण करण्याचा हा प्रयत्न होता. या वयोगटातील




ग्रुपमध्ये खेळाडूंनी स्पर्धेला अधिक जोशपूर्ण करण्यासाठी एका ग्रुप शैली फॉरमॅटमध्ये सामना केला. दिवसभर सर्वश्रेष्ठ कामगिरी बजावणारे खेळाडू संध्याकाळी नॉकआऊट फायनलमध्ये गेले. त्यांच्याकडे प्रभाव पाडण्याची शेवटची संधी होती.

### कधी आणि कुठे होणार ट्रायल?

दिल्ली-एनसीआर- 8 फेब्रुवारी, 2025 (शनिवार, ऑर्किड्स द इंटरनेशनल स्कूल सेक्टर 19, द्वारका गोयला डेयरी, नवी दिल्ली)

पंजाब- 12 फेब्रुवारी, 2025 (बुधवार), गव्हर्नमेंट सीनियर सेकेंडरी स्कूल, कोटाला, समराळा, लुधियाना-चंडीगड हायवे, लुधियाना । कर्नाटक- 15 फेब्रुवारी, 2025 (शनिवार), ऑर्किड्स द इंटरनेशनल स्कूल, येलहंका, होन्नेनहल्ली, येलहंका होबली, दोड्डबल्लापुर रोड, उत्तर, तालुक, बेंगळुरू । महाराष्ट्र- 16 फेब्रुवारी, 2025 (रविवार), ऑर्किड्स द इंटरनेशनल स्कूल, कॉसमॉस आर्केड, आजाद नगर, ब्रह्मांड फेज 4च्यासमोर, टीएमसी वाटर टॅंकच्या बाजूला, कोलशेत, ठाणे (पश्चिम), मुंबई । गुजरात- 22 फेब्रुवारी, 2025 (शनिवार), निकल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, चाणक्य स्कूलच्यासमोर, शुकन क्रॉस रोडजवळ, निकोल-नरोदा रोड, निकोल, अहमदाबाद । पश्चिम बंगाल- 23 फेब्रुवारी, 2025 (रविवार), ऑर्किड्स द इंटरनेशनल स्कूल, ठाकुरपुकुर बिबिरहाट बखराहत रायपूर रोड, रासापुंजा, कोलकाता.

## मातृ-पितृ देवो भव:

# विद्यार्थ्यांसमोर ठेवला भारतीय संस्कृतीचा आदर्श !

### शिक्षण विश्व: एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये मातृपितृ पूजन



। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी

**“मातृ देवो भवः... पितृ देवो भवः” असा महान संदेश देणारी आपली भारतीय संस्कृती आहे. शाळेमध्ये मातृपितृ पूजन दिवस साजरा करून विद्यार्थ्यांना माता-पितांना सन्मान, प्रेम आणि काळजी घेण्यासाठी संदेश दिला जातो. असे एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचे अध्यक्ष पांडुरंग गवळी म्हणाले.**

एस.पी.जी. इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये मातृपितृ पूजन दिवस उत्साह आणि आनंदाने साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी, शिक्षकवर्गाने आणि पालकांनी एकत्र येऊन आपल्या भावना व्यक्त केल्या.

शाळेचे अध्यक्ष पांडुरंग नाना गवळी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेचे संचालक नितीन लोणारी , मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने केली. श्री योग वेदांत सेवा समिती या संस्थे द्वारा कार्यकामाचे आयोजन



करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या संचालिका कीर्ती टिकाम यांनी भारतीय संस्कृतीच्या मूल्यांचे संरक्षण - संवर्धन करण्याच्या दृष्टीने मुलांच्या समोर आई वडिलांना बसविण्यात आले. मुलांनाकडून आई वडिलांचे पूजन करण्यात आले. प्रदक्षिणा घालून नमन केले. यावेळी मुलांनी आई वडिलांना मिठी मारली आणि आई वडिलांनी मुलांच्या डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला.

---

## सायबर सुरक्षा अन् आरोग्य मार्गदर्शन

### प्रतिभा शिक्षण शास्त्र विद्यालयात ज्ञान विस्तार कार्यक्रमांतर्गत व्याख्यान

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी

**चिंचवड येथील कमला शिक्षण संकुल संचलित प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ज्ञानविस्तार कार्यक्रमांतर्गत सायबर सुरक्षा आणि आहार व आरोग्य या विषयावर दोन दिवसीय व्याख्यान कमला शिक्षण संकुलाचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांचे सूचनेनुसार व प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.**




व्याख्यानाच्या प्रथम पुष्पा मध्ये डॉ. हर्षिता वाच्छानी यांनी, संगणक व मोबाईल मध्ये कोणत्या प्रकारची माहिती साठविलेली असते. सोशल मीडियाचे धोके काय आहेत, आणि प्रसंगी आपण सुरक्षित व सावध कसे राहायचे या विषयावर सविस्तर माहिती सांगितली तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे समर्पकपणे निरसन देखील केले, तर टिळक शास्त्र महाविद्यालयाचे डॉ सुरेश इसावे यांनी गुन्हा घडला तर तक्रार कशी नोंदवावी. गुन्हे घडू नये यासाठी कोणती काळजी घ्यावी हे स्पष्ट करून सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. सुवर्णा गायकवाड यांनी, गुन्हे टाळण्यासाठी संगणक मोबाईल याचा वापर काळजीपूर्वक करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रा .सुशील भोंग यांनी केले. विद्यार्थिनी प्रियंका श्रीवास्तव, शितल पुरी यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. चारुशीला रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार शीतल डुंबरे यांनी मानले.

विभाग प्रमुख प्रा सुशील भोंग यांनी आभार मानले. दोन दिवसीय व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी प्रा. मनीषा पाटील , प्रा गीता कांबळे, प्रा अस्मिता यादव , प्रा संतोष उमाटे, प्रा पल्लवी चव्हाण, प्रा हर्षदा जगताप, ग्रंथपाल महेश दुर्शिंग, भावना काकडे, रवींद्र नलावडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा व प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांनी विद्यार्थ्यांनी आहार आणि आरोग्य या संदर्भात जाणीवपूर्वक कोणकोणती काळजी घ्यावी याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

#### आहार-आरोग्य मार्गदर्शन

व्याख्यानेच्या दुसऱ्या दिवसाचे प्रथम सत्रात आहार आणि आरोग्य या विषयावर प्रा. तुलिका चतर्जी यांनी दैनंदिन आहाराबाबत माहिती दिली. तर दुसऱ्या सत्रात डॉ. ज्योत्स्ना लगस यांनी आरोग्य संदर्भात काय काळजी घ्यावी याबाबत माहिती सांगताना दिवसाची सुरुवात कोमट पाणी पिऊन करावी असे स्पष्ट करून दिवसभरातील आहार कसा असावा , याबाबत सर्विस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले.


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


DP Enterprises
one call problem solve
PEST CONTROL
ELECTRICIAN
PAINTING
PLUMBING
All Maintenance Services
Pimpri-Chinchwad, Pune.
PRICE
QUALITY
SERVICE
we provide all types of home services.
CONTACT :- 86000 60593 / 99214 66191


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact : 9657767000 / 9370493922